महाराष्ट्र शासन

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दुरध्वनी : ०२२ २२८५४७०७ Email: shaheen.jamadar@nic.in

क्रमांक: आस्थाप-२०२५/प्र.क्र.१६/आस्थापना दिनांक: १४ जानेवारी, २०२५

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय: शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयावरील पर्यावरण विभागाची जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे. सदर जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाची आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नाव | प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र.२१७, मंत्रालय, मुंबई |
| २ | प्रसिद्धीस देण्याची तारीख | जानेवारी, २०२५ |
| ३ | कामाचे ठिकाण | मंत्रालय, मुंबई |
| ४ | देयक कोणाचे नावे अदा करण्यासाठी पाठवावयाचे | कार्यालयाच्या पत्त्यावर |

आपली,

(शाहीन स्वा. शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय,
१८ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दिनांक- १४ जानेवारी, २०२५

(मंत्रालयीन लघुलेखक संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिका-याची कंत्राटी/करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात)

पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२ या विभागामध्ये दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी मंत्रालयीन सेवानिवृत्त लघुलेखक संवर्गातील एका अधिका-याची करार/कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे. सदर पदांसाठी अर्हता व पात्रतेच्या अटी खालीलप्रमाणे आहेत-

नियुक्तीबाबत अटी व शर्ती

१) कंत्राटी तत्वावरील पद हे शासन सेवेतील नियमित पद नाही.

२) अर्जदार शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून लघुलेखक म्हणून निवृत्त झालेला असावा.

३) अर्जदाराचे वय दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी ६५ वर्षे पेक्षा जास्त नसावे.

४) उपरोक्त कामांसाठी लागणारी विशेष अर्हता मुलाखतीद्वारे तपासण्यात येईल.

५) इंग्रजीचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

६) अर्जदार शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

७) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

८) अर्जामध्ये अर्जदाराने त्याची वैयक्तिक माहिती पुरवावी (शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता पुराव्यासह, पासपोर्ट साईज ३ फोटो, व अनुषंगिक माहिती)

९) या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

१०) कंत्राटी पध्दतीने नियुक्ती झालेल्या उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास मा. प्रधान सचिव (पर्यावरण) यांच्या मान्यतेने एक महिन्याची पूर्वसुचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

११) निवड करण्यात आलेल्या अधिका-यांस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र. क्र.१००/१३ दिनाक १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहील.

१२) उपरोक्त सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ मधील नमुद सर्व अटी व शर्ती सदर नियुक्तीस लागू राहतील,

१३) वर नमुद केल्याप्रमाणे अर्हता धारण केलेल्या व अटी पूर्ण करणा-या इच्छुक व्यक्तींनी पदासाठी आपले अर्ज, प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र.२१७, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात दिनांक, १५ फेब्रुवारी, २०२५, सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत पाठवावेत. प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर अर्जदारांना मुलाखतीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(शाहीन स्वा.शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन